ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ — पुणें, बुधवार तारीख २७ जून, १९५१ — अंक २६

## विविध माहिती

**कृत्रिम रबराच्या टायर्स**—ब्रिटनमधील डनलॉप टायर कंपनी लवकरच कृत्रिम रबराचे टायर्स करूं लागेल असें कंपनीच्या अध्यक्षांनीं वार्षिक सभेच्या आपल्या भाषणांत सूचित केलें. कंपनीला कृत्रिम रबराचा पुरवठा व्हावा म्हणून गेले कांहीं दिवस खटपट चालू करण्यांत आली आहे. कृत्रिम रबराविषयीं संशोधनाहि कंपनीनें चालविलें होतें.

**रशिआची रबराची आयात**— कमी प्रतीच्या धान्याच्या बदला ६,००० टन रबर रशियाला पुरविण्याची तयारी ब्रिटननें दाखविली होती. परंतु नंतर कॉमन्स सभेनें घातलेल्या निर्णयानुसार ब्रिटननें पुरवठा करण्याचें नाकारलें. आतां मलायांतील कंपन्यांकडून रशिआ परस्परच ६,००० टन रबर आयात करणार आहे.

**गाईच्या शेणापासून गॅस**—गाईच्या शेणापासून गॅस तयार करण्याचें एक छोटें यंत्र उस्मानाबाद विद्यापीठाच्या शेतकी खात्यानें तयार केलें आहे. हैदराबाद संस्थानमधील शामीरपेट येथें हें यंत्र दाखविण्यासाठी ठेवण्यांत आलें होतें. ह्या गॅसच्या उपयोगानें प्रकाश व जळण ह्यांची गरज भागूं शकते.

**टोळांचा नाश करणारा तज्ज्ञ**—विल्यम मॅकवी नांवाचा एक टोळविनाशक तज्ज्ञ दिल्लीला येऊन दाखल झाला आहे. राजस्थानमधील ज्या भागांत टोळांचा उपद्रव होण्याचा संभव आहे, त्या भागांतील कामगिरीचें नेतृत्व तो करणार आहे. टोळांचा नाश करण्यास मदत म्हणून जंतुनाशक तेल आणि दोन विमानें अमेरिकेकडून पूर्वींच आलीं आहेत.

**राजस्थानांत कापसाच्या लागवडीची वाढ**—१९५१–५२ सालीं राजस्थान राज्यांत आणखी १ लाख एकर जमिनींत कापसाची लागवड करण्याची योजना सरकारनें आखली आहे. सध्या राजस्थानमध्यें एकूण २ लाख एकर जमिनींत कापसाची लागवड होते.

**इटालिअन नभोवाणीचा हिंदी कार्यक्रम**—भारतासाठी नभोवाणीवरून कार्यक्रम प्रक्षेपित करणाऱ्या देशांत आतां इटलीची भर पडली आहे. भारतीय लोकांसाठी हिंदी भाषेंतून खास कार्यक्रम ठेवण्यांत आले आहेत. वृत्तकथन आणि संगीत असे कार्यक्रम प्रक्षेपित करण्यांत येतात.

**प्लायवुडचा धंदा**—हैदराबाद संस्थानांत प्लायवुडच्या धंद्याला चांगला वाव आहे असें समजतें. संस्थानच्या जंगलांत चहाच्या खोक्यांना लागणाऱ्या लाकडाच्या बऱ्याच प्रकारचीं झाडें पुष्कळ प्रमाणांत सांपडतात.

**वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी**—साताऱ्याच्या ह्या प्रसिद्ध विमा कंपनीनें १९५० सालीं २·६१ कोटी रुपयांचा नवा पूर्ण धंदा केला. त्याच्या मागील वर्षीं २·४५ कोटी रुपयांचा धंदा पूर्ण झाला होता. १९५० सालअखेर कंपनीनें आपल्या विमानिधींत ५१·२ लाख रुपयांची भर टाकली. विमानिधीची रक्कम आतां ४·६६ कोटी रुपये झाली आहे.

**संयुक्त प्रांतांतील ट्रॅक्टर्सचा उपयोग**—संयुक्त प्रांतांतील मध्यवर्ती यंत्रचलित नांगर संघटनेनें १९५० सालअखेर ५९,००० एकर पडीक जमीन नव्यानें लागवडीस आणली. ह्या जमिनींतील शेतीचें उत्पादन सुमारें १४ लाख मण अन्नधान्य होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**भारताला जागतिक बँकेचें कर्ज**—भारताला जागतिक बँकेकडून ७,८५,००,००० डॉलर्स कर्ज मिळालेलें आहे. ह्या कर्जाचा विनियोग रेल्वेजची पुनर्घटना, विजेच्या केंद्रांची उभारणी व शेतकीच्या अवजारांची खरेदी, ह्या कामासाठी प्रामुख्यानें करण्यांत येत आहे.

**जुगाराची प्रवृत्ति कमी झाली**—ब्रिटनमधील चर्चेस कमिटी ऑन गॅंबलिंग ह्या संस्थेनें जुगारांत वापरल्या जाणाऱ्या संपत्तीचा शोध केला आहे. कमिटीला असें आढळून आलें आहे कीं १९४९ सालापेक्षां १९५० सालीं ७·५ कोटी पौंड कमी रक्कम जुगारावर लावण्यांत आली. तथापि १९५० सालीं एकूण ६५ कोटी पौंड इतकी मोठी रक्कम जुगारावर लावण्यांत आली होतीच.

**औद्योगिक तंट्यांच्या संख्येंत घट**—१९४९ सालापेक्षां १९५० सालीं औद्योगिक तंट्यांच्या संख्येंत घट झाल्याचें आढळून आलें आहे. तथापि, मुंबईतील कापड–गिरण्यांत झालेल्या संपामुळें कारखान्यांच्या कामाच्या वेळांत मात्र १९५० सालीं अधिक घट झाली. १९४९ सालीं ९२० औद्योगिक तंटे झाले होते; १९५० सालीं ८१४ तंटे झाले.

**पौंडी गंगाजळीसाठी वाटाघाटी**—भारताच्या पौंडी गंगाजळीसाठी ब्रिटन व भारत ह्यांच्या दरम्यान सध्या वाटाघाटी चालू आहेत असें समजतें. गेल्या सप्टेंबरमध्यें भारताचे अर्थमंत्री ब्रिटनला गेले होते त्यावेळीं पुढें करावयाच्या कराराविषयीं उभयपक्षीं मान्य अशी रूपरेखा आंखण्यांत आली होती. जुलै, १९५१ पासून सुरू होणाऱ्या ६ वर्षांच्या कालांत ब्रिटननें भारताला २१ कोटी पौंड द्यावे असें ठरलें होतें. दरवर्षीं ३॥ कोटी पौंड ह्या कराराप्रमाणें भारताला मिळतील.

### प्रामाणिकपणाची पातळी सगळीकडेच खालावली

भारतांतील जनतेची सचोटी फारच खालच्या दर्जाला पोंचल्याच्या तक्रारी हल्लीं नेहमींच करण्यांत येतात. परवा दोघा अमेरिकन व्यापाऱ्यांनीं प्लॅस्टिकच्या पावडरऐवजीं कोळशाची पूड भारतीय व्यापाऱ्यांना पाठविल्याचें वृत्त आलेलें आहे. ब्रिटनमधील रेल्वे खात्यालाहि सार्वजनिक प्रामाणिकपणा कमी झाल्याचें आढळून आलें आहे. ब्रिटनमधील रेल्वेजमध्यें टॉवेलांच्या चोऱ्या होऊं लागल्याचें रेल्वे अधिकाऱ्यांना कळून आलें आहे. लंडनच्या पश्चिम भागांत स्त्रियांच्या पोषाखाचें एक प्रसिद्ध दुकान आहे. दुकानाच्या व्यवस्थापकांना असा अनुभव आला कीं रोज सरासरी १६ पोषाख चोरीला जातात. लहानमोठ्या सर्व वस्तू विकणाऱ्या एका स्टोअरमधून दरवर्षीं सुमारें ३,००,००० पौंड किंमतीच्या वस्तू चोरीला जातात. जरा वरिष्ठ दर्जाच्या मध्यम वर्गासाठी चालविण्यांत येणाऱ्या एका हॉटेलमधून दरवर्षी कोट अडकविण्याच्या दांड्या सुमारें ७५० चोरीला जातात. फराळाचें दुकान १० वर्षें चालविलेल्या एका मालकाचा असा अनुभव आहे कीं बहुतेक गिऱ्हाइकें अप्रामाणिक असतात. मोड देतांना चुकून जास्त पैसे दिले गेले तर ग्राहकांपैकीं फारच थोडे ते परत करतील. मि. सीबॉम राऊनट्री नांवाच्या ब्रिटिश समाजशास्त्रज्ञानें वरील माहिती आपल्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकांत दिली आहे. ह्या परिस्थितीचीं कारणें देतांना ग्रंथकारानें दोन महायुद्धाकडे बोट दाखविलें आहे. ग्रंथकार म्हणतो, "अनेक वर्षें लोकांना मारण्यास, खोटें बोलण्यास, फसविण्यास व चोरी करण्यास शिकविण्यांत आल्यावर, युद्ध संपतांच त्यांनीं प्रामाणिकपणानें वागावें अशी अपेक्षा करणेंच चुकीचें आहे."

---

### मध्यवर्ती सरकारच्या बड्या नोकरांचे पगार

भारतीय पार्लमेंटच्या एस्टिमेटस् कमिटीनें अशी एक सूचना केली होती कीं, मध्यवर्ती सरकारच्या कोणत्याहि नोकराला दरमहा तीन हजार रुपयांपेक्षां अधिक पगार असूं नये; आणि ज्यांना सध्या त्या रकमेपेक्षां जास्त पगार मिळतो त्यांना ३ हजार रुपयांवरील रक्कम स्वेच्छेनें सोडण्याची विनंति करण्यांत यावी. परंतु ही सूचना भारतीय सरकारनें नामंजूर केली आहे असें समजतें. भारतांत ज्यावेळीं सत्तांतर झालें त्यावेळीं कांहीं नोकरांना मिळणारे ३ हजार रु. अगर अधिक पगार चालू ठेवण्यांत येतील असें आश्वासन देण्यांत आलेलें होतें. ज्यांना लठ्ठ पगार मिळतो तेहि देशासाठी झीज सोसण्यांत मागें राहिलेले नाहींत हें लोकांना पटविण्यासाठी कमिटीनें वरील सूचना केली होती. सध्या ११७ बड्या नोकरांना ३ हजार रुपयांपेक्षा अधिक पगार मिळतो. त्यापैकीं २२ जणांच्या जागा घटनेच्या कायद्याप्रमाणेंच निर्माण करण्यांत आलेल्या आहेत. उदा. सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश, हायकोर्टाचे न्यायाधीश, कंट्रोलर व ऑडिटर जनरल इत्यादि. ह्या जागा सोडून भारतीय सरकारच्या बाकीच्या बड्या नोकरांच्या पगारांत कपात करण्यांत आलेलीच आहे. ही कपात महिना २५० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत सुद्धा झालेली आहे. सरकारचें म्हणणें असें आहे कीं, सध्याची महागाई लक्षांत घेतां ह्या नोकरांचे पगार आणखी कमी करणें अयोग्य ठरेल. शिवाय मोठाले पगार मिळविणाऱ्या नोकरांची संख्या इतकी थोडी आहे कीं त्यांच्या पगारांत छाटाछाट करून होणारी बचतहि फारशी मोठी होणार नाहीं. सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन एस्टिमेटस् कमिटीची सूचना अंमलांत न आणण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

---


दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतिलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास ती सुसज्ज आहे.



'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



बँक ऑफ महाराष्ट्र लि.
लक्ष्मी रोड पुणें २

बँकेच्या शाखा
मुंबई, नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर कोल्हापूर, व द. हैद्राबाद.

ग. ल. हळबे,
जे. मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १७ जून, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटनमधील युद्ध-तयारी व सामान्य जनतेचें जीवन यांचा समन्वय

युद्धतयारीसाठी लष्करी खर्च व इतर पूर्वतयारीचा खर्च करीत असतांना ब्रिटनसारखा देश डोईजड लष्करी खर्च सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें मारक ठरूं नये म्हणून कशी दक्षता बाळगीत आहे हें समजणें उद्बोधक ठरेल. कारण, युद्धतयारीच्या प्रयत्नांना व लष्करी खर्चाला प्राधान्य दिलें म्हणजे त्याचे परिणाम नेहमींच्या अर्थव्यवहारावर होणारच. सामान्य जनतेला विशेष त्रास सोसावा लागूं नये यासाठीं ब्रिटननें हल्लीं पुढील तीन मार्गांचा अवलंब केला आहे. पहिला मार्ग म्हणजे कर-योजना अशा तऱ्हेनें ठरविणें कीं, त्यामुळें मालाची मागणी व समाजांत राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी या दोहोंवर परिणाम होऊन ज्यांच्या हातांत जास्त पैसा जातो त्याच वर्गांतील लोक ज्या वस्तूंवर विशेष कर आहेत अशा चैनीच्या वस्तू खरेदी करूं शकतात. १९५१ च्या ब्रिटनच्या अंदाजपत्रकांत याप्रमाणें तरतूद करण्यांत आली आहे. दारू, तंबाखू व करमणूक यांवर विशेष कर लादण्यांत आले आहेत. खाजगी मोटारी व टेलिव्हिजन सेट्स यांवरहि कर-वाढ करण्यांत आली आहे. आवश्यक अन्नविषयक मालाच्या किंमती सामान्य जनतेच्या कक्षेत येतील इतक्या मर्यादित ठेवण्यांत आल्या आहेत, व किंमती मर्यादित राखण्यासाठीं ब्रिटिश सरकार स्वत: बराच खर्च करितें.

ब्रिटननें स्वीकारलेला दुसरा मार्ग म्हणजे उत्पादनावर योग्य तें नियंत्रण ठेवणें व त्याला आवश्यक असें वळण लावणें. कारखानदारांनीं लोकांना उपयोगी पडेल अशा दर्जाचा माल काढावा यासाठी प्रयत्न केले जातात. कारण, उपयुक्त व किंमतीच्या दृष्टीनें परवडणारा माल तयार झाला तरच तो सामान्य जनतेला खरेदी करतां येतो. अशा तऱ्हेच्या मालामध्यें गृहोपयोगी लाकडी सामान, पादत्राणें, लोंकरीचें कपडे, पायमोजे इ. मालाचा समावेश होतो. ज्या पदार्थांचा विशेष तुटवडा भासत आहे अशांच्या सामान्य उपयोगावर नियंत्रणें घालण्यांत आलीं आहेत. उदाहरणार्थ जस्त, तांबें, व पितळ या तीन वस्तू निरनिराळ्या सामान्य उपयोगाच्या १५० वस्तू तयार करण्यांत वापरतां येत नाहींत. यामुळें हा कच्चा माल अगदी आवश्यक अशा युद्धविषयक उत्पादनासाठी मिळूं शकतो. ह्या कच्चा मालाचा पुरवठा व्हावा यासाठींहि सरकारमार्फत विशेष प्रयत्न केले जातात. अगदी आवश्यक अशा अन्नविषयक पदार्थांच्या बाबतींत वांटपपद्धति चालू ठेवण्यांत आली आहे. अगदी आवश्यक बाबतींत वांटपपद्धति व बहुतेक मालाच्या किंमती मर्यादेंत राखणें हा आजच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी ब्रिटननें स्वीकारलेला तिसरा मार्ग आहे. रेल्वेच्या वाहातुकीचे दर व जागांचीं भाडीं यांवरहि नियंत्रण आहे. याप्रमाणें वरील तीन प्रकारच्या उपायांनीं ब्रिटननें युद्धप्रयत्नांच्या दृष्टीनें तयारी करतांना सामान्य जनतेचें जीवन दुःसह होणार नाहीं या उद्देशानें विशेष काळजी घेतली आहे.

## बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्ती

### (१) 'डिमांड' देण्याची व्याख्या, (२) रिझर्व्ह फंडाचा विनियोग

१९४९ च्या हिंदी बँकिंग कंपनीज ॲक्टांत दुरुस्ती करण्याचा भारत सरकारचा विचार आहे. दोन प्रमुख दुरुस्त्या खालीलप्रमाणें आहेत.

(१) सध्या बँकांना आपल्या देण्याच्या २०% एवढी रक्कम रोख किंवा निर्वेध रोख्यांत बाळगावी लागते. 'डिमांड' देण्यांत, हल्लींच्या कायद्याप्रमाणें, इतर बँकांकडून घेतलेलीं व इंपीरिअल बँकेकडून घेतलेलीं कर्जें मोजलीं जातात. फक्त रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलीं कर्जें त्यांत धरलीं जात नाहींत. इंपीरिअल बँक ही रिझर्व्ह बँकेची एजंट असल्यानें तिचेकडून घेतलेलीं कर्जेंहि 'डिमांड' देण्यांत धरूं नयेत, अशी दुरुस्ती केली जाणार आहे.

(२) सध्याच्या कायद्याप्रमाणें, बँकांना आपल्या नफ्यापैकीं २०% रक्कम रिझर्व्हमध्यें टाकावी लागते. रिझर्व्ह फंड वसूल भांडवलाच्या बरोबरीचा होईपर्यंत असें करावें लागतें. कांहींहि आपत्ति आली, तरी रिझर्व्ह फंडास हात लावता येत नाहीं. बँकेनें रिझर्व्हमधून कांहीं रक्कम काढली तर ती काढल्यापासून २१ दिवसांचे आंत ती गोष्ट रिझर्व्ह बँकेस कळविली पाहिजे, आणि रिझर्व्हजला हात कां लावला त्याचें कारणहि दिलें पाहिजे, अशी दुसरी दुरुस्ती आहे.

### युनायटेड बँक ऑफ इंडिया लि.

बेंगॉल सेंट्रल बँक लि., कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन लि., कॉमिल्ला युनियन बँक लि. व हुगळी बँक लि., ह्यांतून निर्माण झालेल्या युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. चा पहिला ताळेबंद प्रसिद्ध झाला आहे. तिच्या १०९ शाखांपैकीं १८ पाकिस्तानांत आहेत. एकत्रीकरणापूर्वी एकूण १४४ शाखा होत्या. १०९ शाखांपैकीं ३५ कलकत्ता शहरांत असून आणखी २१ पश्चिम बंगाल मध्यें आहेत. बंगाल, बिहार, ओरिसा आणि आसाम ह्यांचेबाहेर तिच्या फक्त १२ शाखा आहेत. हिंदी बँकिंग क्षेत्रांत युनायटेड बँक ऑफ इंडियाचा सातवा अनुक्रम लागतो एवढी मोठी ती झाली आहे. बँकेचा ताळेबंद ३६ कोटी, ९३ लक्ष रुपयांचा आहे.

### ग्लासगो विद्यापीठाचा ५०० वा वाढदिवस

ग्लासगो विद्यापीठाचा ५०० वा वाढदिवस नुकताच साजरा करण्यांत आला. ह्या विद्यापीठांत १,४०० स्त्रिया धरून ७,२०० विद्यार्थी आहेत. १८ व्या शतकाचे उत्तरार्धांत ह्या विद्यापीठाची कीर्ति शिखरास पोंचली होती. अर्थशास्त्राचा मूळ पुरुष जॉर्ज ॲडॅम स्मिथ, शरीरशास्त्राचा अध्वर्यू विल्यम हंटर व वाफेच्या शक्तीचा संशोधक जेम्स वॅट हे तिथे त्या वेळीं ग्लासगो विद्यापीठाशींच संबंधित होते.

### महाराष्ट्र बँकेच्या नव्या शाखा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. सांगली, अमरावती व कुर्ला येथें लवकरच शाखा उघडणार आहे, असें समजतें.

## गेल्या नऊ वर्षांतील चलनवाढीचें विवेचन

## किंवा

## काळ्या बाजारांत गेलेला पैसा

कलकत्ता येथें प्रसिद्ध होणाऱ्या ' इंडियन फिनॅन्स ' या सुप्रसिद्ध साप्ताहिकाच्या ता. १२ मेच्या अंकांत त्या पत्राच्या प्रसिद्ध लेखक इष्ठज ड्रापर यानें ' क्लाइव्ह स्ट्रीट गॉसिप ' या नेहमींच्या सदरांत गेल्या दहा वर्षांत काळ्या बाजारांत जाणाऱ्या चलनी नोटांचें मार्मिक विवेचन खालीलप्रमाणें केलें आहे.

" सप्टेंबर १९३९ मध्यें महायुद्धाला सुरवात झाली. नंतर लौकरच चलनविस्ताराला सुरवात झाली परंतु १९४० व ४१ सालीं किंमतींमध्यें विशेष वाढ झाली नाहीं. सप्टेंबर १९३९ ते मार्च १९४२ पर्यंतचा एक भाग व मार्च १९४२ पासून ते मार्च १९४३ अखेरपर्यंतचा दुसरा भाग मानूंया. पहिल्या भागांत चलनी नोटांची संख्या १७२ कोटी, ३७ लक्ष रुपयांपासून ४१० कोटी रुपयांपर्यंत वाढली. म्हणजे ही वाढ एकंदर ३१ महिन्यांत झाली. चलनामध्यें या काळांत २३७ कोटी, ६३ लक्ष इतक्या नोटांची वाढ झाली. ही वाढ १३१ टक्के होती. परंतु या काळांत राहाणीचा निर्देशांक मात्र ३२ नीं वाढला. ( १०२ वरून १३२ वर आला. ) म्हणजे या पहिल्या काळांत चलनी नोटांची वाढ १३१ टक्के झाली परंतु राहणीच्या खर्चाची वाढ २९.४ टक्के व सर्वसाधारण किंमतींची वाढ ३४.८ टक्के झाली. मार्च १९४२ ते मार्च १९४३ या १३ महिन्यांत चलनी नोटा ४१० कोटी-पासून ६४३ कोटी, ५८ लक्ष पर्यंत वाढल्या. म्हणजे नोटांमध्यें वाढ ५६.९ टक्के झाली. परंतु या १३ महिन्यांत सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतींत ७७.४ टक्के वाढ झाली व राहाणीच्या निर्देशांकांत ५२.२ टक्के वाढ झाली. मार्च १९४२ पासून किंमतींत विशेष वाढ होऊं लागली. १९४२ च्या मध्यापासून जादा नफ्या-वरील कर चुकविण्याकडे प्रवृत्ति निर्माण होऊं लागली. म्हणजेच १९४२ पासून काळ्या बाजारांत जाणाऱ्या नोटांना सुरवात झाली. धंद्यांत झालेला नफा सरकारच्या लक्षांत येऊं नये यासाठीं हा जादा पैसा सोनें, रुपें, हिरेमाणकें यांमध्यें गुंतविण्यांत आला. पैसा सुरक्षित गुंतविला जावा ही यांतील दृष्टि होती. यानंतर वस्तूंची साठेबाजी करण्यांत कांहीं पैसा खर्चण्यांत आला. याप्रमाणें वस्तूंची साठेबाजी करून व त्या वस्तू काळ्या बाजारांत भरमसाट नफ्यानें विकण्याची प्रवृत्ति बळावली व ज्यांच्या हातांत पुष्कळ पैसा येत होता त्यांनीं या मार्गानें काळ्या बाजारासाठीं या पैशाचा विनियोग केला. ज्यांच्या हातांत अगदीं बेताच्या प्रमा-णांत पैसा येत असे त्यांनीं नोटा साठवून त्यांचा विनियोग लग्न इ. प्रसंगीं खर्चासाठीं केला. याप्रमाणें १९४२ नंतर मिळालेल्या जादा पैशाचा विनियोग पुढीलप्रमाणें निरनिराळ्या चार मार्गांनीं करण्यांत आला. प्रथम कांहीं पैसा सोनें, रुपें, हिरे इ. च्या खरेदींत खर्ची पडला. नंतर कांहीं पैसा केवळ जवळ साठवून ठेवण्यांत आला. तिसरा मार्ग म्हणजे ज्यांच्या हातांत पुष्कळ पैसा येत होता त्यांनीं त्यापैकीं कांहीं काळ्या बाजारासाठीं राखून ठेवला. चवथा मार्ग म्हणजे मध्यम स्थितींतील कांहीं लोकांनीं साठवलेला पैसा लग्न इ. प्रसंगीं खर्च केला. वरील चार मार्गांपैकी पहिल्या व चवथ्या मार्गानें खर्ची पडणारा पैसा, म्हणजे सोनें, रुपें इ. च्या खरेदीसाठीं व लग्न इ. प्रसंगीं खर्चासाठीं, केव्हांना केव्हां तरी पर्यायानें नाणेबाजारांत परत जातो व म्हणून तो मारक ठरत नाहीं. परंतु केवळ साठेबाजी करून ठेवलेला पैसा व काळ्या बाजारासाठीं उपयोगांत आणला गेलेला पैसा हा केव्हांहि सामा-जिक दृष्ट्या नुकसानकारक ठरतो. काळा बाजार अजिबात बंद झाल्याशिवाय महागाई दूर करण्याचा प्रश्न सोडवितां येणार नाहीं.

"मार्च १९४२ पासून वर्षाला रु. १५० कोटी या प्रमाणांत पैसा सतत नऊ वर्षें काळ्या बाजारांत गेला असावा. म्हणजे हा सर्व पैसा अंदाजें रु. १३५० कोटी असावा. यापैकीं रु. २०० कोटी-च्या नोटा दडवून ठेवण्यांत आल्या असाव्यात. प्रत्यक्ष काळ्या-बाजाराच्या व्यवहारांत रु. २०० कोटी नोटा गेल्या असाव्या व बाकीच्या रु. ९५० कोटींच्या नोटा कोणत्या ना कोणत्या प्रकारानें नाणेबाजारांत परत गेल्या असाव्यात. कारण सोनें, रुपें, जडजवा-हीर, सामाजिक कार्यांसाठी ( लग्न इ. ) खर्च वगैरे बाबतींत हा पैसा खर्ची पडला असावा. "

वरील विवेचन कोणालाहि पटेल असेंच आहे. मतभेद असूं शक-तील ते फक्त प्रत्यक्ष सांठवलेला पैसा किती किंमतचा असावा, काळ्या बाजाराच्या व्यवहारांत किती पैसा गोळा झाला असावा इत्यादि बद्दल. सरकारी नियंत्रणें व वांटपपद्धति यांच्या अपुरेपणामुळें काळा बाजार निर्माण होऊं शकतो, व सरकारी धोरणांत एकसूत्रीपणाचा व निश्चितपणाचा अभाव याहि गोष्टी अप्रत्यक्षपणें काळ्या बाजाराला मदत करूं शकतात. सोनें, रुपें, जडजवाहीर व लग्नकार्यें इ. वर खर्चलेला पैसा नाणेबाजारांत परत जात असला तरी हा पैसा कांहीं वेळां कित्येक दिवसपर्यंत संग्रहीं सांठवून ठेवलेला पैसा असतो व सोनें, रुपें इ. च्या किंमती वाढविण्याकडे अशा पैशाची प्रवृत्ति असते. म्हणजे चलन या नात्यानें याहि पैशाचा अर्थव्यवहारा-साठीं व्हावा तितका योग्य उपयोग होत नाहीं. उदाहरण द्यावयाचें झालें तर आगगाडीचे मालवाहतुकीचे डबे कांहीं दिवस रिकामे ठेवण्याप्रमाणें या पैशाचा अर्थ व्यवहारावर परिणाम होत असावा.

## मुंबई राज्यांतील औद्योगिक सहकारी संस्था

### ( ३१-१२-१९५० रोजीं )

| संस्थेचा प्रकार | सोसायट्यांची संख्या | संस्थेचा प्रकार | सोसायट्यांची संख्या |
|---|---|---|---|
| प्रांतिक संघ | १ | झाडू उत्पादक | १ |
| जिल्हा संघ | १५ | मीठ " | ५ |
| हात व विद्युत्माग विणकर | ४०७ | मच्छेमार | २८ |
| चर्मकार व ढोर | १७० | शिवणकाम | ६ |
| धातु कामगार | १४ | जंगल कामगार | ८४ |
| सुतार व लोहार | ७१ | सामान्य कंत्राटी मजूर | ३८ |
| सोनें व चांदी कारागीर | ७ | कांचबांगडी उत्पादक | ५ |
| वर्कशॉप | १ | बटण व शिंगकाम | २ |
| छापखाने | ८ | चंदनी कोरीव काम | २ |
| तेल घाणे | ४६ | वहातुक सोसायट्या | ७ |
| मधु-संचय | ९ | महिलांच्या सोसायट्या | २१ |
| कुंभार सोसायट्या | ९ | निर्वासितांच्या सोसायट्या | ४२ |
| वेत व बांबू कारागीर | २६ | किरकोळ | ६२ |
| हातकागद उत्पादक | २ | औद्योगिक बँका | ४ |
| रंगकाम | ९ | | |
| दोर उत्पादक | २१ | | एकूण १०३८ |

## गो. स. पारखे औद्योगिक मान पारितोषिकांचे यंदाचे मानकरी

चालू सालीं पारितोषिकांसाठी एकूण नऊ वस्तू मराठा चेंबरकडे आल्या होत्या. त्यांचें परीक्षण जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. चे संचालक श्री. गो. ग., दांडेकर, पैसाफंड ग्लास वर्क्सचे अध्यक्ष श्री. दा. वा. पोतदार, पेपर अँन्ड पल्प कन्व्हर्शन्सचे मॅनेजिंग एजंट्स श्री. म. स. पारखे, साठे बिस्किट अँण्ड चॉकोलेट कंपनी लि. चे संचालक श्री. ग. रा. साठे आणि किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. चे जनरल मॅनेजर श्री. शं. ल. किर्लोस्कर, यांच्या समितीनें केलें. समितीनें (१) प्लास्टिक प्रॉडक्टस ऑफ इंडिया लि., सातारा यांना त्यांच्या फिनाल फार्मल्ड डी हाईड मोल्डिंग पावडरबद्दल पहिलें बक्षिस रु. १५०, (२) भारत पेन्सिल्स, पुणें यांना त्यांच्या शिसपेन्सिलीबद्दल दुसरें बक्षिस रु. १२५, व (३) पँको एंजीनियरिंग लि. कोल्हापूर यांना त्यांच्या चटणी पूड यंत्राबद्दल तिसरें बक्षिस रु. १०० देण्याची शिफारस केली. हीं पारितोषिकें ना. गाडगीळ ह्यांच्या हस्तें १६ जून रोजीं समारंभपूर्वक देण्यांत आलीं.

### पारितोषिकें मिळविणाऱ्या कारखान्यांची त्रोटक माहिती

प्लास्टिक प्रॉडक्टस ऑफ इंडिया लि., सातारा, हा कारखाना १५ ऑगस्ट, १९४७ ला स्थापन झाला असून १९४९ सालापासून त्यांत प्लास्टिकच्या वस्तू बनविण्यासाठी जी फिनाल फार्मल्ड डी हाईड मोल्डिंग पावडर लागते ती बनवली जात आहे. देशांत उत्तरोत्तर विजेचें व टेलिफोनचें महत्त्व आणि विस्तार यांची स्वाभाविकच अधिकाधिक वाढ होत असल्यानें त्यास लागणाऱ्या प्लॅस्टिकच्या साहित्याची मागणीहि वाढत आहे. या प्लॅस्टिक साहित्याच्या बनावटीसाठी कच्चा माल म्हणून लागणारी ही मोल्डिंग पावडर देशांतल्या देशांतच तयार होणें हें आपल्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें अत्यंत श्रेयस्कर आहे. अखिल भारतांत ही पावडर बनविणारे फक्त दोनच कारखाने असून त्यांपैकीं प्रस्तुतचा कारखाना हा एक आहे. कारखान्यांत तयार झालेली पावडर सांप्रत अनेक प्लॅस्टिक कारखान्यांत वापरली जात असून या धंद्याच्या वाढीस खूपच वाव आहे. मेसर्स जाजू आणि कंपनी हे कारखान्याचे मॅनेजिंग एजंटस आहेत. कारखान्यांत सुमारें दीड लक्ष रुपयांचें भांडवल गुंतलें आहे.

पुण्याचा भारत पेन्सिल्स हाहि कारखाना अखिल महाराष्ट्रांत एकमेवाद्वितीय असा आहे. हा कारखाना १९४७ सालापासून सुरू झाला असून त्यांत सध्यां दररोज ५० ग्रोस माल तयार होत आहे. शिसपेन्सिल ही नित्याची गरज आहे आणि बहुजन समाजांत शिक्षणप्रसार जसजसा वाढेल तसतशी पेन्सिलीची मागणी वाढणार असल्यानें या धंद्याची वाढहि क्रमप्राप्तच आहे. कारखान्याचे एक भागीदार श्री श्री. श्री. मराठे हे असून त्यांनीं पेन्सिलीस लागणाऱ्या शिशाबाबतचे प्रयोग आपले सहकारी श्री. जोशी यांचेबरोबर प्रथम करून नंतरच उत्पादनास हात घातला आहे. त्यांच्या भारत पेन्सिलीस चांगली मागणी असून उत्तरप्रदेश सरकारहि दरसाल त्यांचा माल घेत आहे. कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा होईल तर या कारखान्यांतील सध्याच्या यंत्र-सामुग्रीवर रोज १०० ग्रोस माल काढतां येईल. या कारखान्यांत सुमारें दीड लक्ष रुपयांचें भांडवल गुंतलें आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा : १ दादर २ माहीम ३ बेळगांव ४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

बक्षिस मिळविणारा तिसरा कारखाना म्हणजे कोल्हापूरचा पँको एंजीनियरिंग लि. होय. हा कारखाना १९४८ सालीं स्थापन झाला असून त्यांत ऑइल एंजिनें, भाताच्या, पिठाच्या गिरण्या, सेंट्रिफ्युगल पंप, पुलीज वगैरे माल तयार होतो. अलिकडेच ह्या कारखान्यानें मिरची पूड करण्याचें प्रस्तुत मशीन बनवून बाजारांत आणलें असून कांहीं ठिकाणीं तें वापरांतहि आहे. अशा प्रकारचीं परदेशी यंत्रें पूर्वी होतीं. पण पँकोच्या प्रस्तुत यंत्राचा विशेष हा आहे कीं, या यंत्रांत मिरचीची पूड एकाच क्रियेंत होते. इतरांच्या यंत्रांत दोन क्रियांनीं पूड होते. ताशीं १०० पौंड मिरची यांत कुटली जाते. पँकोचे एक संचालक श्री. यशवंतराव पवार यांच्या कल्पकतेंतून हें यंत्र निर्माण झालें असून या कामीं त्यांच्या सहकाऱ्यांची त्यांना मदत झाली आहे. या कारखान्यांत सांप्रत ११५ कामगार आहेत व कारखान्याचें भांडवल सुमारें दीड लक्ष रुपयांचें आहे.

### श्री महावीर को. बँक लि.

ह्या बँकेची स्पेशल जनरल सभा १६ जून, १९५१ रोजीं भरून तिनें ३० जून, १९५० अखेरच्या अहवालास व हिशेबाच्या पत्रकांस मान्यता दिली. अहवालाचे सालअखेर बँकेच्या एकूण सभासदांची संख्या ८३३ आहे. बँकेकडील ठेवींत विशेष फरक पडलेला नाहीं. गुंतविलेल्या रकमेचें ठेवींशीं प्रमाण ७६% आहे. चालू सालचा निव्वळ नफा (११,२४२ रु.) बँकेच्या पूर्वीच्या कोणत्याहि वर्षापेक्षां अधिक आहे. बँकेचें वसूल भांडवल ६४,५६० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ह्यांतील रकम आतां ५९,३९४ रु. झाली आहे. एकूण ठेवी ४,५७,८९७ रु. च्या असून ताळेबंदाची बेरीज ६,०२,७२६ रु. आहे. बँकेनें १,९७,७४८ रु. रोख व बँकांत ठेवून व ४५,४५२ रु. रोख्यांत गुंतवून ३,५२,१९० रु. कर्जांत गुंतविले आहेत. बँकेस डिस्कौंट, कमिशन, बट्टाव वगैरेचें उत्पन्न चांगलें येऊन तिनें आपल्या आकाराच्या मानानें मोठा नफा मिळविला आहे. (प्रेसिडेंट : बापूसाहेब यशवंत आवटे. व्हाइस प्रेसिडेंट : कल्लोप्पा सखाराम जिरगे. मॅनेजर : डी. बी. शेटे, बी. ए.)

**माकडें पकडण्याची मोहीम**—मद्रास राज्यांतील गोदावरी, चित्तूर आणि चिंगलपेट ह्या जिल्ह्यांतून माकडांचा उपद्रव फारच वाढला आहे. पूर्व गोदावरी जिल्ह्यांत ४,००० एकर जमिनींतील भाताच्या पिकांचें माकडांच्या टोळ्यांनीं अतिशय नुकसान केल्याची बातमी आहे. माकडें मारण्यास लोकांचा विरोध होत असल्यानें त्यांना पकडून परदेशीं पाठविण्याचा सरकारचा विचार आहे. आतांपर्यंत १,७०० माकडें पकडण्यांत आलीं आहेत.

**अमेरिकन लोक किती कॉफी पितात?**—नॅशनल कॉफी असोसिएशन ह्या संस्थेनें अशी माहिती प्रसिद्ध केली आहे कीं अमेरिकन नागरीक दरवर्षी सुमारें १,००,००,००,००,००० कप कॉफी फस्त करतात.

## कच्च्या मालाच्या तुटवड्याचें वास्तविक स्वरूप

यू. नो. च्या संशोधन व नियोजन विभागानें युरोपची १९५० ची आर्थिक पहाणी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. त्यावरून असें अनुमान निघतें कीं कोरियन प्रकरण उद्भवलें नसतें व युरोपियन राष्ट्रांनीं युद्धतयारी केली नसती तरीहि बहुतकरून कच्च्या मालाचा तुटवडा सर्व ठिकाणीं जाणवला असता. याचें कारण असें कीं कोरियन प्रकरण उपस्थित होण्यापूर्वीच युरोपांत व बाकीच्या सर्व जगांत औद्योगिक उत्पादन कच्च्या मालाच्या उत्पादनापेक्षां जास्त प्रमाणांत होत होतें. १९४९ सालीं विशेषतः अमेरिकेंत वस्तूंच्या किंमती उतरूं लागल्या होत्या. परंतु १९५० च्या पहिल्या तिमाहींतच ही परिस्थिति बदलून उत्पादन व किंमती यांच्या बाबतींत अविश्वास पुन्हा निर्माण झाला होता. १९४९ सालीं रशिया वगळून बाकीच्या युरोपचें उत्पादन युद्धपूर्वीच्या उत्पादनापेक्षां १० टक्क्यांनीं वाढलें होतें. १९५० सालीं तें १३ टक्क्यांनीं वाढलें, व १९५१ च्या पहिल्या तिमाहींत तें २३ टक्क्यांनीं वाढलें होतें. औद्योगिक उत्पादन वाढलें परंतु कच्च्या मालाचें उत्पादन त्या प्रमाणांत वाढलें नाहीं आणि संग्रहीं असलेले कच्च्या मालाचे सांठे उपयोगांत आणले जाऊं लागले. अमेरिकेचें औद्योगिक उत्पादन गेल्या वर्षी युद्धपूर्वीच्या उत्पादनाच्या दुप्पट झालें, व अमेरिकेच्या कच्च्या मालाच्या मागणीचा परिणाम आज जागतिक बाजारपेठेवर झाला आहे. अमेरिकेनें कोरियन प्रकरणापासून केलेल्या साठेबाजीमुळें कच्च्या मालाचे बाजारभाव कडाडत चालले, व रबर आणि टिन या वस्तूंचा पुरेसा पुरवठा असूनहि इतर कच्च्या मालाच्या बरोबर याहि वस्तूंचे भाव वाढले. युरोपमध्यें शेतीमालाचें उत्पन्नहि घटत आहे. सारांश, कोरियन प्रकरणापासून कच्च्या मालाचा तुटवडा तीव्र झाला असला तरी यापूर्वीच एक दोन वर्षें सर्व ठिकाणीं कच्च्या मालाचा पुरवठा कमी प्रमाणांतच होत होता.

---

**"दर्शन अपार्टमेंट" : सहकारी तत्त्वावरील १० मजली प्रासाद**

मलबार हिल को. हौसिंग सोसायटी लि. नें वरील नांवाची प्रचंड इमारत मुंबई येथें मौंट प्लेझंट रोड, मलबार हिल येथें बांधण्याचें योजिलें आहे. ह्या इमारतींत ५८ सुसज्ज फ्लॅटस् असतील आणि गच्चीवर बाग, पोहण्याचा तलाव, टेनिस कोर्ट, मुलांसाठीं क्रीडोद्यान, दुकान, चहाची सोय इत्यादि सुखसोयी करण्यांत येतील. इमारत १० मजल्यांची होईल.

---

**ओगले ग्लास वर्कसचा संक्षिप्त ताळेबंद**

**( ३१–१२–५० अखेर )**

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | १४,८६,८५७ | इमारती | १०,५४,२३५ |
| रिझर्व्ह फंड | २,६०,००० | फरनेस इ. | १,३५,२८७ |
| मशिनरी रिझर्व्ह | १,९१,४४० | माशिनरी, इ. | ६,५६,७२० |
| डि. ई. फंड | ७२,३६३ | मुंबई कारखानाखातें | ३,४५,०३६ |
| कर्जें व ठेवी | १३,५२,५६९ | कच्चा माल | ८,१६,४५० |
| इतर | ६,४७,९५६ | स्टॉक इन ट्रेड | २,९३,४८१ |
| | | इतर | ६,९१,३४७ |

---


## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७

हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली.

शाखाः—१ जत, २ मिरज, ३ तासगांव.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें " | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर. |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

सरकारतर्फेः—

मे. भ. अं. वसरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फेः—

मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फेः—

मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर. भ. अं. वसरदार, बी. ए. चेअरमन.



## पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीची सर्व प्रकारची अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

## पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.

पुणें कॉर्पोरेशनची हद्द वाढल्यामुळें पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीच्या कार्यक्षेत्रांतहि वाढ झाली आहे. आतां कंपनीच्या तारांची लांबी खालीलप्रमाणें आहे:—

२२·६१ मैल ११ Kv. हायटेन्शन ओव्हरहेड मेन्स
१२·८७ मैल ११ Kv. हायटेन्शन अंडरग्राउंड मेन्स
२९·५४ मैल ३·३ Kv. हायटेन्शन ओव्हरहेड मेन्स
२९·५६ मैल ३·३ Kv. हायटेन्शन अंडर ग्राउंड मेन्स
२०१·२६ मैल लोटेन्शन मेन्स.

१९५० सालीं कंपनीनें डायरेक्ट करंटवरील २९६ कनेक्शन्स अल्टरनेटिंग करंटवर घेतलीं. रस्त्यांवरील ६,८०० दिवे कंपनीच्या विजेनें प्रकाशित होत आहेत; १९५० सालीं ३११ नवे दिवे बसविण्यांत आले.

मर्क्युरी व्हेपर दिवे बसविण्याचा कॉर्पोरेशनचा तगादा आहे. १९५० साली कंपनीनें ८,६०,००६ रु. भांडवली खर्च केला. एकूण उत्पन्न ४०,२६,१३५ रु. झालें व घसारा, कर, इत्यादिसकट सर्व खर्च वजा घालून ६,१३,७३९ रु नफा उरला व ७% करमाफ डिव्हिडंड दिलें. कंपनीच्या प्रगतीची कल्पना खालील तक्त्यावरून येईल:—

| | ग्राहक (संख्या) | जोडलेलें 'लोड' (Kw.) | वीज विक्री (यूनिटस) | विक्रीपासून उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|---|
| १९४६ | १७,७५५ | १७,२८२ | २,६१,५२,०४२ | २३,२६,८८० |
| १९४८ | २१,५१५ | २३,६१६ | ३,५३,३५,५६० | २९,३२,१३६ |
| १९५० | २५,५८२ | २८,१२६ | ४,९२,८८,७१७ | ३८,२२,०९० |

### राहाता सोसायटीचा उपक्रम

ऑल इंडिया रेडिओच्या मुंबई केंद्रावर श्री. पी. आर. पाटील, जिल्हा शेतकी अधिकारी, नगर यांचें 'केळीची लागण' या विषयावर ता. १७–६–५१ रोजीं सायंकाळीं ६–२० वाजतां महत्त्वपूर्ण भाषण झालें. सदर प्रसंगीं राहाता ग्रुपमल्टिपरपज सहकारी सेल सोसायटी लि. यांचे ऑफिसांत प्रमुख शेतकरी २५–३० व इतर नागरिक ५०।६० असे लोक हजर होते. सोसायटीनें शेतकऱ्यांना रेडिओ ऐकण्यासाठी सार्वत्रिक जागीं लावून निमंत्रित केलेले होते. सो. नें राहाता भागांत करडई पेंड (एक्सपेलरची) जनावराकरितां व पिकाकरितां सुरू केलेली आहे. खप वाढता आहे.

**रशिआचीं जेट विमानें**—कोरिआंत लढणाऱ्या एका अमेरिकन वैमानिकानें रशिआच्या जेट विमानांची पुढील उद्बोधक माहिती आपल्या खासगी पत्रांत लिहिली आहे. "एफ् ८४ ह्या अमेरिकन जेट विमानापेक्षां रशिआची एम. आय. जी. १५ हीं विमानें सर्वच बाबतींत अधिक चांगलीं आहेत. त्यांचा वेग एफ्. ८४ पेक्षां खूपच अधिक आहे. रशियन विमानांच्या नाशासंबंधीं जे आकडे प्रसिद्ध होतात ते हास्यास्पद आहेत."

**अमेरिकेंतील शिक्षकाचा पगार**—अमेरिकेमधील सार्वजनिक शाळांतून नोकरी करणाऱ्या शिक्षकाचा सरासरी पगार १९५०–५१ सालीं ३,०८० डॉलर्स पडला. १९२५ ते १९४९ ह्या काळांत अमेरिकेच्या मोठ्या शहरांतील शाळांतील शिक्षकांचा पगार ८४ टक्क्यांनीं वाढला. १९५०–५१ सालांतील सरासरी पगाराचा रुपयांतील हिशोब सुमारे १५,००० रु. होतो.

फोन: ३४५१९ तार: SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन-
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड (सुती व लोंकरी), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–५० अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,६०,४६५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ७५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २–०–० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर



## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. चापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.